Literacy for a Billion

Movie: Mulgi Jhali Ho
Year: 1985

Song: Sale Sale Sale Lavlay Sale
Lyricist: Shashi Gajwani

सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
घाऊक सेल बंपर सेल जंगी सेल
नवऱ्या मुलांचा नवऱ्या मुलांचा सेल
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
पळा पळा हो घाई करा हो
शेवटची संधी दवडू नका
पळा पळा हो घाई करा हो
शेवटची संधी दवडू नका
दवडू नका दवडू नका
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल

हा तर आहे डबल ग्रॅज्यूएट
फॉरेन रिटर्न
अहो हा तर आहे डबल ग्रॅज्यूएट
फॉरेन रिटर्न
हुद्दा मोठा पगार मोठा
झालायं इंजिनिअर
अहो हुद्दा मोठा पगार मोठा
झालाय इंजिनिअर
अहो नोकर चाकर गाडी बंगला

सायबी मुलगा दिला लाखाला
काय
अहो एक लाखाला
अरे बापरे
चला चला हो त्वरा करा हो
मॉर्डन मुलगा सोडू नका
चला चला हो त्वरा करा हो
मॉर्डन मुलगा सोडू नका
सोडू नका सोडू नका
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल

हयाला बॅंकेत नोकरी
हो त्याचा पगार चार आकडी
तसा नावाचा आहे कारकून
त्याला मिळणार आहे बढती
हयाला व्यसन नाही तंबाखू सुपारीचं
दारू जुगारापासून
आहे तो चार हात लांब
नाही हा बोलत
नाही हा हालत
वाटतो बहिरा मुका
अहो बघा
दिसतो बहिरा मुका
छे छे छे छे छे
हा तर आहे सुधारक मतांचा
पुरोगामी विचारांचा

PlanetRead
Literacy for a Billion

पण लग्नाबाबत
आई वडिलांच्या अर्ध्या वचनांतला
हुंडयाचं काय
शू....
हो पण हुंडयाचं काय
कायदयानं बंदी आहे हुंडा घ्यायला
रोकड पैका अडका नको त्याला
स्कूटर टि व्ही फ्रीज
आणि पंचवीस तोळं सोनं
काय म्हणलात
अहो पंचवीस तोळं सोनं
उठा उठा हो झोपू नका हो
देखणा नवरा सोडू नका
उठा उठा हो झोपू नका हो
देखणा नवरा सोडू नका
सोडू नका सोडू नका
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
हयाला म्हणत्यात फाकडे पाटील अन्
लाख दीड लाख तरी त्याला बसतेलं
हे ये हे ये हे ये हा
हयाला म्हणत्यात फाकडे पाटील अन्
लाख दिड लाख तरी त्याला बसतेलं
जमीन बघा एक पन्नास एकर
तीन ट्रक अन् ट्रॅक्टर बुलढोझर
कूळ नुसतंच मालदार न्हाई
त्याचं गावात वजन हायं भारी

हे ये हे ये हे ये हा
जरा कराल काय कमी जास्त
तुम्हां सांगितलं आधी रास्त
अहो जरा कराल काय कमी जास्त
हां तुम्हां सांगितलं आधी रास्त
मी तीन पोरींचा बाप आहे हो फाकडे
तर पळता इकडे तिकडे

मी तीन पोरींचा बाप आहे हो फाकडे
तरी पळता इकडे तिकडे
लई टाईट हाय मार्केट तुमचं
न्हाई बजेट तेवढं आमचं
लई टाईट हाय मार्केट तुमचं
न्हाई बजेट तेवढं आमचं
न्हाई बजेट तेवढं आमचं
न्हाई बजेट तेवढं आमचं
बोला बोला चूप राहू नका
खानदानी पोरगा सोडू नका
बोला बोला चूप राहू नका
खानदानी पोरगा सोडू नका
हा सोडू नका तुम्ही सोडू नका
काय सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
हॅ ला ला ला...
अहो म्हणे
सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल
हॅ सेल सेल सेल लावलाय
सेल सेल सेल

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*